# उलगडला शास्त्रज्ञाचा जीवनप्रवास

पुणे, ता. १९ : 'पंचाहत्तरीपर्यंतच्या प्रवासात अनेकांची साथ लाभली. त्यातील काही आहेत, काही नाहीत. सर्वांत जास्त पाठिंबा दिला पत्नी मंगला हिने. प्रत्येक बऱ्या-वाईट प्रसंगांत ती माझ्या पाठीशी उभी राहिली. वडील विष्णू नारळीकर आणि गुरू फ्रेड हॉयल या दोन व्यक्तींचा माझ्यावर मोठा प्रभाव असल्याने मी घडलो,'' अशा शब्दांत आंतरराष्ट्रीय कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी शुक्रवारी जीवनप्रवास उलगडला.



**पुणे विद्यापीठ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित आयुका केंद्र येथे डॉ. भांबा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी मंगला नारळीकर उपस्थित होत्या.**

पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त सुहृदांनी घडवून आणलेल्या एका छोटेखानी सत्काराला उत्तर देताना डॉ. नारळीकर बोलत होते. मोजक्या मित्रमंडळी, सहकारी, विद्यार्थी आणि चाहत्यांच्या उपस्थितीत आयुकाच्या सभागृहात झालेल्या या समारंभाला मंगला नारळीकरांसह, अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, वास्तुविशारद चार्ल्स कोरिया, आयुकाचे माजी संचालक नरेश दधिच, गणितज्ज्ञ डॉ. भांबा, 'नेहरू तारांगण'चे संचालक अरविंद परांजप्ये, आकाश निरीक्षक डॉ. प्रकाश तुपे, ज्योतिर्विद्या परिसंस्थेचे अध्यक्ष एम. एस. लोखंडवाला, प्रा. एस. एम. तथा कुमार चित्रे आदी उपस्थित होते.

ज्योतिर्विद्या परिसंस्था व आकाश मित्र या हौशी खगोलनिरीक्षकांच्या संस्थांच्या वतीनेही नारळीकर यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. ज्योतिर्विद्या परिसंस्थेने दिलेले सन्मानपत्र संस्कृतमध्ये असून, त्यावर नारळीकर यांच्या जन्मठिकाणचा आणि जन्माच्या वेळचा आकाशाचा नकाशा आहे.

नारळीकर यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या दोन दिवसांपासून आयुकामध्ये विविध शास्त्रीय कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते.

नारळीकर हे वेगाने विचार करणारे शास्त्रज्ञ आहेत. फळ्यावर सुवाच्य अक्षर काढण्याची कला फार कमी जणांना जमते. नारळीकरांनी मात्र ती अवगत केली आहे, असे प्रा. चित्रे यांनी नारळीकरांविषयी बोलताना सांगितले. विविध समित्यांवर काम करताना नारळीकरांचे प्रभावी विचार आणि निर्णय अनुभवल्याची आठवण डॉ. काकोडकर यांनी सांगितली. तर, आयुकात प्रशासनाची घडी नारळीकर यांनी उत्तमरीत्या बसविल्याने आपल्याला प्रशासनात शून्य वेळ द्यावा लागल्याचे दधिच म्हणाले.

आयुकाचे संचालक प्रा. अजित केंभावी यांनी सूत्रसंचालन केले. या वेळी समीर धुरडे यांनी नारळीकर यांच्या जीवनावर बनविलेला खास स्लाइड शोही दाखविण्यात आला.